


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : १५३ ● पुणे ● सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



यशवंत जमीन विक्री प्रकरणी सभासदांची... 3



मणिभाई देसाई यांची १०५वी जयंती उत्साहात साजरी 4

## ठळक बातम्या

### पुतण्याकडून चुलत्याचा खून; बनाव उघडकीस

तासगाव (आरंभ पर्व): किरकोळ वादातून रागाच्या भरात चुलत्याच्या डोक्यात चिनी मातीची भरणी घालून खून केल्याची घटना कवठेएकंद (ता. तासगाव) येथे उघडकीस आली आहे. पुतण्या सुबहान उस्मानगणी तांबोळी (वय २३) याने त्याचे चुलते मिरासो बांबू तांबोळी (वय ६२) यांचा खून केला. खुनाच्या घटनेनंतर जिन्यावरून चढताना चिनी मातीची बरणी डोक्यात पडून आकस्मिक मृत्यू झाल्याचा बनाव केला होता. मात्र वैद्यकीय अहवाल आणि पोलिसांनी केलेल्या तपासानंतर हा आकस्मिक मृत्यू नसून खून झाल्याचे उघडकीस आले. त्यानंतर संशयित आरोपीला अटक करून तासगाव पोलिसांनी फिर्याद दाखल केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी, २४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता मिरासो बाबू तांबोळी हे चिनी मातीची बरणी डोक्यावर घेऊन जिन्यावर चढत असताना पडून पडल्यानंतर डोक्यावर भरणे पडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यांना तासगाव येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले होते यावेळी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती तेथे शव विच्छेदन करण्यात आले होते.

### कोल्हापूरच्या कनेक्टिव्हिटीला नवी उभारी

कोल्हापुर (आरंभ पर्व): कोल्हापुरात प्रादेशिक कनेक्टिव्हिटी वाढवणे, वाहतूक कोंडी कमी करणे आणि आर्थिक विकासाला चालना देणे या उद्देशाने रचना कन्स्ट्रक्शन लिमिटेडने ३०० कोटी रुपयांचा परिवर्तनकारी रस्ते पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतला आहे. प्रगत बांधकाम तंत्रांचा वापर करून टिकाऊ पायाभूत सुविधा निर्माण करून वाहनांच्या वाढत्या वाहतुकीला सामावून घेणे आणि विद्यमान रस्त्यांच्या रुंदीकरणाद्वारे व मजबूतीकरणाद्वारे त्यांमध्ये सुधारणा करणे, या दृष्टीने या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची रचना करण्यात आली आहे. प्रमुख औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी क्षेत्रांमधील वाहतुकीची सोय या प्रकल्पामुळे वाढणार आहे. त्यामुळे सुरळीत प्रवास आणि कार्यक्षम लॉजिस्टिक्सला प्रोत्साहन मिळणार आहे. पावसाचे पाणी साठवणे, ग्रीन लँडस्केपिंग आणि पर्यावरणपूरक साहित्य यांचा समावेश असलेल्या शाश्वत पद्धतींवर भर देणे हा या घडामोडीचा एक महत्त्वाचा पैलू आहे. यातून पर्यावरणपूरक वाटचालीची कंपनीची कटिबद्धता दिसून येते. हा प्रकल्प ५३ किमीचा असून कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी त्यात नवीन अधिक क्षमतेचे रस्ते, पूल आणि उड्डाणपूल बांधण्याचा समावेश आहे. सुरक्षितता आणि प्रवास कार्यक्षमता वाढविण्यासाठी आधुनिक वाहतूक चिन्हे,प्रकाशयोजना आणि पादचाऱ्यांसाठी अनुकूल क्षेत्र असलेल्या स्मार्ट वाहतूक व्यवस्थापन प्रणालीही यामध्ये अंमलात आणल्या जातात. रचना कन्स्ट्रक्शन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुजित मुळे म्हणाले, आम्ही या प्रकल्पाकडे रस्ते विकास आणि पायाभूत सुविधांच्या पलीकडे पाहतो – हा कोल्हापूरच्या भविष्यातील विकासाचा चालक आहे.

# साप्ताहिक नोंदणीवर दैनिकांचे प्रकाशन

## पुणे शहरासह पुणे जिल्ह्यातील अनेक साप्ताहिकांची नावे 'आरंभ पर्वच्या' हाती

- साप्ताहिक नोंदणीवर दैनिकांचे झालेले प्रकाशित आणि डिजिटल अंक 'आरंभ पर्वच्या' हाती
- लवकरच मोठी कारवाई होणार; नियमबाह्य प्रकारांना ऊत



**गंभीर मुद्दे**

- साप्ताहिक रजिस्ट्रेशन असूनही 'दैनिक' असा लोगो वापरणे हे वाचकांची दिशाभूल करणारे आहे.
- आर्थिक अनियमितता आणि जाहिरात धोरणात गैरप्रकार होण्याची शक्यता वाढते.
- अधिकृत दैनिकांसाठी लागू असलेल्या जबाबदाऱ्या आणि पारदर्शकतेच्या निकषांपासून अशी माध्यमे दूर राहत असल्याने स्पर्धा बिघडते.
- काही ठिकाणी स्थानिक यंत्रणांनाही याबाबतची माहिती असूनही कारवाई होत नाही, असा आरोप पत्रकार संघटनांनी केला आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यात साप्ताहिक वृत्तपत्रासाठी घेतलेल्या नोंदणीच्या आधारे काही प्रकाशकांनी दररोज वृत्तपत्र छापण्याचा प्रकार सर्रास सुरू केला आहे. मुद्रण व प्रकाशन कायद्याचे आणि माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करत काही मंडळी साप्ताहिक परवान्यावर दैनिक वृत्तपत्र चालवत असल्याचे समोर आले आहे.

दैनिक वृत्तपत्र चालवण्यासाठी विशिष्ट निकष अनिवार्य आहेत – जसे की, स्वतंत्र दैनिक नोंदणी, नियमित मुद्रण तपशीलांची नोंद, नियोजित कर्मचारी संख्या, प्रसारणाचा तपशील इत्यादी. तसेच दैनिक प्रकाशित करण्यासाठी रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया (RNI) कडून स्वतंत्र मान्यता घ्यावी लागते. मात्र या प्रक्रियेला बगल देत काही साप्ताहिक प्रकाशक दररोज अंक प्रसिद्ध करत आहेत.

**पत्रकार संघटनांची मागणी**

: या प्रकारांना आळा घालण्यासाठी साप्ताहिक नोंदणी असलेल्या वृत्तपत्रांची तपासणी करून जर ती दैनिक स्वरूपात सुरू असल्याचे आढळले, तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी विविध पत्रकार संघटनांकडून केली जात आहे.

यामुळे प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या दैनिक वृत्तपत्रांना अन्यायकारक स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे, असा आरोपही करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत काही ठिकाणी माहिती व जनसंपर्क विभाग आणि RNIने संयुक्तपणे कारवाई सुरू केल्याची माहिती आहे. मात्र व्यापक पातळीवर नियमित तपासणी आणि कठोर कारवाई होईपर्यंत हा गैरप्रकार थांबणार नाही, अशी भावना माध्यम क्षेत्रात व्यक्त होत आहे.

## WhatsApp मध्ये सीक्रेट चॅटसाठी आलं नवं फीचर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इन्स्टंट मेसेजिंग एप WhatsApp ने Advanced Chat Privacy नावाचं एक नवीन प्रायव्हसी फोक्स्ड फीचर आणलं आहे. हे फीचर अशा प्रकारे डिझाइन केलं आहे की ते युजर्सच्या सर्वात संवेदनशील संभाषणांचं संरक्षण करेल. आता हे फीचर ग्लोबली रोलआऊट करण्यात आलं आहे.

या नवीन फीचरअंतर्गत, नवीन सेटिंग्ज उपलब्ध असतील, ज्या पर्सनल चॅट आणि ग्रुप चॅट दोन्हीसाठी उपलब्ध असतील. अशा परिस्थितीत, जेव्हा जेव्हा युजर्सना असं वाटतं की त्यांचं कोणतंही चॅट अधिक संवेदनशील आहे, तेव्हा ते एडव्हान्स्ड चॅट प्रायव्हसीच्या मदतीने त्यांचा कंटेंट WhatsApp च्या बाहेर शेअर होण्यापासून रोखू शकतील. WhatsApp च्या या लेटेस्ट अपडेटनंतर, सेटिंग्जमध्ये दिलेला पर्याय चालू केल्यानंतर, तुम्ही इतर लोकांना चॅट्स एक्सपोर्ट करण्यापासून, फोनवरील मीडिया ऑटो-डाउनलोड करण्यापासून रोखू शकता. तुम्ही इतर युजर्सना सहजपणे खात्री देऊ शकाल की चॅटमधील किंवा तुमच्या संभाषणातील कंटेंट कुठेही लीक होणार नाही.



नवीन फीचर इनेबल करण्यासाठी तुम्हाला सेटिंग्जमध्ये जाऊन ते ऑन करावं लागेल. यासाठी चॅटच्या नावावर आणि नंतर 'ॲडव्हान्स्ड चॅट प्रायव्हसी' वर टॅप करा. हे या फीचरचं पहिलं व्हर्जन आहे. येत्या काळात कंपनी या फीचरसोबत सुरक्षेशी संबंधित इतर अनेक फीचर देखील समाविष्ट केली जाऊ शकतात. ग्लोबल रोलआऊट केल्यानंतर हे फीचर काही युजर्सपर्यंत पोहोचलं आहे आणि उर्वरित युजर्सना लवकरच मिळेल. WhatsApp मध्ये प्रायव्हसी लक्षात घेऊन अनेक फीचर आहेत. तुम्हाला हवं असल्यास तुम्ही तुमचं कोणतंही पर्सनल चॅट लॉक करू शकता. कोणतंही चॅट लॉक करण्यासाठी त्याच्या नावावर क्लिक करा, त्यानंतर तुम्हाला नवीन पर्याय मिळतील, जर तुम्ही खाली स्क्रोल केलं तर तुम्हाला चॅट लॉकचा पर्याय देखील मिळेल.

# पुण्यात बनावट फॅशन इव्हेंटचा सुळसुळाट; पैसे घेऊन अनेक तरूण-तरुणींचा मानसिक छळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात फॅशन शोच्या नावाखाली तरुण-तरुणींना गंडा घालण्याचे प्रकार वाढले आहेत. आकर्षक करिअर आणि प्रसिद्धीचे स्वप्न दाखवत अनेक आयोजकांकडून सहभागासाठी मोठ्या प्रमाणावर नोंदणी शुल्क वसूल केले जात आहे, मात्र स्पर्धा पूर्ण न होता किंवा पारितोषिकांची आश्वासने पूर्ण न करता आयोजक फरार होत असल्याचे प्रकार समोर येत आहेत.

अलीकडेच एका प्रसिद्ध मॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कथित 'फॅशन वॉक' मध्ये सहभागी झालेल्या अनेक स्पर्धकांनी आपली फसवणूक झाल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल केली आहे. आयोजकांनी "नॅशनल लेव्हल" स्पर्धांचे आमिष दाखवत प्रत्येकी ५ ते १५ हजार रुपयांचे शुल्क आकारले. मात्र कार्यक्रमाआधीच आयोजकांचा पत्ता कट झाला.

फसवणुकीचे शिकार झालेले काही स्पर्धक म्हणाले, "आम्हाला प्रोफेशनल फोटोशूट, मॉडेलिंग प्रोजेक्ट्स आणि फिल्म ऑफर्स देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. पण नंतर ना कार्यक्रम पार पडला ना पैसे परत मिळाले."

पोलिसांनी प्राथमिक चौकशीत काही ठोस धागेदोरे मिळवले असून, लवकरच दोषी व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. याप्रकरणी संबंधित आयोजकांवर फसवणूक व विश्वासघाताच्या कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, सोशल मीडियावर या स्पर्धांचे भडक जाहिरातबाजी केली जात असून, युवा वर्गाला आकर्षित करण्यासाठी खोट्या प्रलोभनांचा वापर केला जात आहे. त्यामुळे पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि नोंदणीपूर्वी स्पर्धेचे organizer व credential नीट तपासण्याचे आवाहन केले आहे.

**लवकरच नावांसह पुरावे प्रसिद्ध होणार**

**यासंदर्भातील ठोस पुरावे आणि संबंधितांची नावे लवकरच दै. 'आरंभ पर्व' समोर आणणार आहे. तोपर्यंत, सर्व मॉडेल्स आणि आयोजकांनी सावध राहणं अत्यंत आवश्यक आहे. कोणाची फसवणूक झाली असेल आणि त्यांना न्याय हवा असेल त्यांनी ७२७६३१४१४२ यावर संपर्क करावा अथवा. aparvinfo@gmail.com यावर पुराव्यांसह माहिती द्यावी.**








# मजबूत औद्योगिक धोरण हवे

अमेरिकेला पुन्हा एकदा महान बनवण्यासाठी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जी पावले उचलत आहेत त्यांनी जागतिक व्यवस्थेला पूर्णपणे हादरवून टाकले आहे. ट्रम्प यांच्या निशाण्यावर मुख्यतः चीन आहे पण भारताला त्याचा फटका बसत आहे, पण अमेरिकेच्या या धोरणाला देण्यासाठी भारतालाही तसेच मजबूत औद्योगिक धोरण हवे आहे कारण ती आज काळाची गरज आहे. ट्रम्प जी पावले उचलत आहेत त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला पूर्णपणे हादरवले आहे तसेच त्यांची औद्योगिक क्षमता पार उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यापासून वाचण्यासाठी या देशांना एकत्र येऊन उपाय शोधण्याची गरज आहे आणि त्यात भारतही आलाच. काही देश अमेरिकेशी समझोता करू पाहत आहेत. भारताच्या रणनीतीकारांनाही भारताची दीर्घकालीन रणनीती ध्यानात घेऊन त्यानुसार काम करायला हवे. देशाची औद्योगिक क्षमतेला अधिक खोल आणि सर्वसमावेशक बनवले तरच आपण अमेरिकन संकटातून तरून जाऊ अशी परिस्थिती आज आहे. ही गोष्ट खरी आहे की भारताच्या औद्योगिक क्षमता आज चीनच्या तुलनेत खूपच मागे आहेत. जपान आणि चीनचा औद्योगिक विकास आमच्यासाठी खूप उपयुक्त धडा होऊ शकतो.

चीन अमेरिकेशी व्यापारी सौद्यात भारताच्या तुलनेत अत्यंत मजबूत स्थितीत आहे आणि हे वास्तव आहे. अमेरिकेला त्यांच्या विनिर्माण निर्मात्यांची गरज आहे आणि आपल्या विशाल व्यापारी अधिशेषाला अमेरिकी महसूलात गुंतवणूक करून अमेरिकी अर्थव्यवस्थेला सहारा देण्याची क्षमता चीनमध्ये आहे. जपान आणि चीनने धोरण म्हणून मजबूत विनिर्माण उद्योगांची निर्मिती केली. प्रतिस्पर्धी लाभाच्या सिद्धांतानुसार मुक्त व्यापार दीर्घ विधीत प्रत्येकाला ज्याचा त्याचा मुक्त लाभ देत असतो. प्रत्येक देश तेच उत्पादन करतो जो दुसऱ्यापेक्षा चांगले करू शकतो आणि हे देश दुसऱ्याकडून केवळ तीच उत्पादने खरेदी करत असतो जे दुसरे देश त्याच्यापेक्षा अधिक चांगले उत्पादन करत असतात. हे ध्यानात घेऊन भारताने आपली आगामी व्यापारी रणनीती आखली पाहिजे. अधिक मुक्त व्यापाराकडे वाटचाल करायची म्हणजे आयात शुल्काला टप्प्यांटप्प्यांनी कमी करणे याचा समावेश आहे. कोणत्याही विकसनशील अर्थव्यवस्थेत तयार उत्पादनांपेक्षा असेंबल करून उत्पादन करणाऱ्यांची संख्या नेहमीच जास्त असते. जेव्हा एखाद्या अर्थव्यवस्थेचा खप वाढतो तेव्हा असेंबल करणाऱ्यांची संख्याही तेजीने वाढत असते. हे ध्यानात घेऊन भारताने आपली रणनीती ठरवायला हवी. यात एक बाजू अशीही आहे की मुक्त व्यापार कधीही खऱ्या अर्थाने निरपेक्ष व्यापार राहिला नाही.



ताकदवार देश जसे की, अमेरिका किंवा चीन हे नियम बनवतात आणि इतरांना त्यांचे पालन करावे लागते. जेव्हा त्यांच्या अनुरूप हे नियम असत नाहीत तेव्हा ते नियमच बदलून टाकतात. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांना जेव्हा ते अमेरिकेच्या आड येऊ लागले तेव्हा ते नियमच बदलून टाकण्यात आले आणि औद्योगिक नियमांना तिलांजली देण्यात आली. हे तर अगदी अलीकडचे उदाहरण आहे. भारताबद्दल बोलायचे तर भारत आज एका चौकात उभा आहे. भारतापुढे आज दोन प्रश्न आहेत. त्याला पश्चिमी औद्योगिक संपन्न राष्ट्रांपुढे झुकले पाहिजे किंवा स्वतःची नवी रणनीती ठरवायला पाहिजे हे ते दोन प्रश्न आहेत. भारताचे रूपांतर एका मोठ्या शक्तीशाली बाजारपेठेत होऊ शकते आणि त्यासाठी देशाचे उत्पन्न वाढले पाहिजे आणि जास्तीत जास्त संख्येने लोक रोजगारक्षम असतील. त्यांच्या कौशल्यात सुधारणा झालेली असेल. विभिन्न अर्थव्यवस्था नव्या क्षमता शिकल्यानंतर त्यांच्या आधारावर तर पुढे जातात. एखाद्या देशाच्या घरगुती उद्योजकतेला ते सर्व काही शिकले पाहिजे जी पूर्वी त्यांच्याकडे नव्हती. भारतासारख्या देशात अमेरिकेला टक्कर द्यायची असेल, तर त्यातील कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारचे कौशल्य शिकणे आणि आत्मसात करणे आवश्यक आहे. श्रम बाजारपेठ अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ आहे आणि येथे बुनियादी म्हणजे मुळापासून बदल करण्याची गरज आहे. याच्याबाबतीत आपल्याला चीन, इंडोनेशिया आणि सिंगापूर या देशांचे उदाहरण लक्षात ठेवावे लागेल. येथे चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी काहीही नव्हते. तेथे लोक जगत म्हणजे कसेबसे जगत असत. आज ते देश अमेरिकेच्या बरोबरीने आले आहेत आणि औद्योगिकरणाने त्यांच्यात क्रांती केली आहे. जपानचे उदाहरण तर आपल्या जवळचे आहे. जपान दोन वेळा उद्ध्वस्त झाला आणि त्यातून राखेतून उठला आणि आज तो देश अमेरिकेशी टक्कर देत आहे, त्या देशांचे अनुकरण भारताने केले पाहिजे. त्यासाठी स्वतःला बदलावे लागेल आणि आपल्या उद्यमशीलतेला नवीन आयाम द्यावे लागतील. भारताची स्थिती आज डावाडोल झाली असतानाच भारताला हेही लक्षात घ्यावे लागेल की, टॅरिफ युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताला टॅरिफ युद्धाचा प्रचंड प्रभाव पडणार आहे. त्याचवेळी भारताला आपले जीडीपी वाढवावे लागेल. आज ते केवळ २,३ टक्के आहे. भारताकडून अमेरिकेला आज निर्यात फारच कमी होते. त्यामुळे भारतावर व्यापार युद्धाचा परिणाम कमी होईल तसेच त्याचा फटका जास्त बसणार आहे. भारताची अमेरिकेला निर्यातच कमी असल्याने त्याचा प्रभाव सीमित राहणार आहे. हा एक फायदा आहे, पण भारताबरोबर व्हिएतनाम, चीन आणि बांगलादेश या देशांशी अमेरिकेची निर्यात कमी असल्याने भारत यात प्रतिस्पर्धी म्हणून उदयास येऊ शकतो. पण यातही एक अडचण आहेच. भारताशिवाय अन्य प्रतिस्पर्धी देशही जसे की, आशियाई देशही अमेरिकेशी कमी टॅरिफचे करार करू शकतात आणि भारताच्या समझोत्यात अडसर ठरू शकतात. कॅनडा आणि मेक्सिको हे देश अमेरिकेशी आपली निर्यात वाढवून संपर्क वाढवू शकतात आणि तसे झाले, तर भारताला मागे पडावे लागेल. ही शक्यता आहे की, भारताला जर २६ टक्के निर्यात शुल्काचा सामना करावा लागला, तर भारतातील वाहनांचे सुटे भाग बनवणाऱ्या कंपन्या आणि निर्यातदार अमेरिकी बाजारपेठेत मागे पडतील आणि कॅनडा तसेच अन्य देश त्यांच्याशी स्पर्धा करतील. भारताची निर्यातदार सेवा पुरवठादार कंपन्या यामुळे प्रभावित होतील. इतिहास असे सांगतो की अमेरिकी अर्थव्यवस्था जेव्हा मंद गतीने चालते तेव्हा अमेरिकन गुंतवणूक मंद चालते आणि अमरिकन कंपन्या गुंतवणुकीत उशीर करतात.

अमेरिकेच्या व्यापार टॅरिफ धोरणामुळे भारतीय कंपन्या अनेक प्रकारांनी प्रभावित होतील आणि देशांतर्गत कंपन्यांना याचे नुकसान जास्त सोसावे लागेल. त्यामुळे भारतासाठी ठोस औद्योगिक धोरण हवे म्हणजे आपण अमेरिकेच्या टॅरिफशी टक्कर देऊ शकू आणि टॅरिफचा सामना करू शकू. याच दरम्यान दोन बातम्या अशा आहेत की, ज्या भारताच्या चिंता वाढवणाऱ्या आहेत. त्यात एक आहे ती म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने म्हणजे वर्ल्डबँकेने भारताचा वाढीचा दर ६.२ टक्क्यांवर आणला आहे आणि वैश्विक अनिश्चिततांचा परिणाम जास्त आहे असे जागतिक बँकेने म्हटले आहे.

## श्रुती प्रविण ‘सुपरमॉडेल २०२५’ स्पर्धेची फायनलिस्ट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील श्रुती प्रविण यांची ‘सुपरमॉडेल २०२५’ या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित सौंदर्यस्पर्धेसाठी फायनलिस्ट म्हणून निवड झाली असून, या यशाने पुणेकरांचे नाव रोशन केले आहे. मॉडेलिंगच्या क्षेत्रात अलीकडेच पदार्पण केलेल्या श्रुतीसाठी ही निवड एक मोठं पाऊल असून, त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास अनेक तरुणींना सृजनशीलता आणि व्यावसायिकता यांचा समतोल साधण्याचे बळ देणारा ठरत आहे.



श्रुती मूळच्या केरळ राज्यातील मल्लपूरम जिल्ह्याच्या असल्या तरी त्यांचा जन्म आणि संगोपन पुण्यातच झाला आहे. त्यांनी सेंट मिरा कॉलेज फॉर गर्ल्स, पुणे येथून एम.कॉम (बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन) या शाखेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या त्या एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत (MNC) पूर्ण वेळ नोकरी करत आहेत.

स्वयंसेवा, चित्रकला, स्वयंपाक, फोटोग्राफी, बागकाम, कविता, कथा व कोट लेखन अशा विविध छंदांमध्ये रस असलेल्या श्रुती यांनी USsquare मीडिया अँड पब्लिसिटीसोबत मॉडेलिंग क्षेत्रात सुरुवात केली असून, त्यांनी आपल्या सृजनशीलतेचा व्यावसायिक आयुष्यातही उत्तम उपयोग केला आहे.

या यशामागे सतत प्रोत्साहन देणाऱ्या आणि योग्य दिशादर्शन करणाऱ्या उद्धव खराड सरांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत. तसेच, भविष्यात अधिक संधी मिळाव्यात अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

त्यांच्या काही विशेष उपलब्धींमध्ये २०१९–२० मध्ये ‘यंग रिसर्चर्स’ जर्नलमध्ये संशोधन प्रबंध प्रसिद्ध होणे, एनएसएसच्या उपक्रमात सहभाग, तसेच मासिक पाळी आरोग्य व स्वच्छतेसाठी कार्यरत स्फेरुल फाउंडेशनमध्ये सक्रिय सहभाग यांचा समावेश आहे.

श्रुती प्रविण यांचा हा प्रवास आधुनिक तरुणींना प्रेरणा देणारा ठरतो, जो करिअर आणि छंद यांच्यात समतोल राखत नव्या संधींचा पाठपुरावा कसा करावा, याचा आदर्श आहे.



## श्रीदेवी भागवत ज्ञानेधनाचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्री स्वामी समर्थ नामगौरव ट्रस्ट, पुणे यांच्यावतीने हिंगणे खु. सिंहगड रोड विठ्ठल मंदिर येथे श्रीदेवी भागवत ज्ञानयज्ञ हा आठ दिवसांचा पवित्र कार्यक्रम संपन्न होत आहे. या कार्यक्रमाचा प्रसंगी श्रीदेवी भागवत ज्ञानयज्ञ श्री. विजयजी कुलकर्णी व सौ. पुष्पा कुलकर्णी यांच्या शुभहस्ते होम हवन(सौरयाग) संपन्न झाले. प्रसंगी श्री व सौ कुलकर्णी यांचा सत्कार माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केला. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजक श्री.

- **ॲड. प्रसन्नदादा जगताप यांची विशेष उपस्थिती**

दिगंबरजी भास्कर कुलकर्णी, त्यांचे सहकारी मित्रवर्य मा. सचिनजी अनंत कळंबे सोबतच इतरही अनेक मान्यवर या कार्यक्रमात सहभागी होते. दररोज या ठिकाणी भागवत गीता आणि दु.12-3 प्रसादाचा देखील कार्यक्रम होत आहे. सिंहगड रोड परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केले.

## थोडक्यात



### नूतन मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांचा सत्कार

**धायरी (आरंभ पर्व) : धायरी येथील भाजपचे युवा नेते श्री. यशवंत. लायगुडे यांची खडकवासला विधान सभा मतदार संघ मंडल अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. त्याबद्दल ट्रिपल महाराष्ट्र केसरी सह.पोलीस निरीक्षक .पै विजय भाऊ चौधरी यांनी भेट घेऊन सत्कार केला व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रभाग अध्यक्ष पै. तुषार सुभाष पोकळे पाटील उपस्थित होते.**

### वसंतोत्सवात पारंपरिक लोककलेला उजाळा

**पुणे (आरंभ पर्व) : फोकलोर अ‍ॅन्ड कल्चरल हेरिटेज फाउंडेशन पुणे यांच्यावतीने एक दिवसीय वसंतोत्सवाचे आयोजन श्रमिक पत्रकार भवन येथे करण्यात आले होते. वसंतोत्सवाचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे ललित कला केंद्राचे प्रमुख डॉ. प्रवीण भोळे यांच्या हस्ते उद्‌घाटन पार पडले. वसंतोत्सवाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून वसंतोत्सवाची उत्सवाची सुरुवात अत्यंत आनंददायक वातावरणात झाली. सर्वात प्रथम आधी चैत्र गौरी म्हणजे चैत्रांगणाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख अतिथी डॉ. जितेंद्र पानपाटील, प्रवीण भोळे, शैला खांडगे आणि फाउंडेशनच्या संचालक डॉ. सुनीता धर्मराव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. या प्रसंगी वसंतोत्सवच्या कार्यक्रमाबद्दलची भूमिका आणि प्रास्ताविक डॉ. सुनीता धर्मराव यांनी केले. या प्रसंगी मृणालिनी खंदारे, लोकसाहित्य अभ्यासक व उद्योजिका प्रा. शैला खांडगे, प्राचार्य, कृषी तज्ञ, पटकथालेखक, डॉ. सुवर्णा बिभीषण चवरे आदी मान्यवर उपस्थितीत होते. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. सुखदा खांडगे यांनी कथ्थक केले, गौरी वनारसे व निकिता बहिरट यांच्या संबळ वादन करून देवीचा जागरण करण्यात आले.**

## मोटारीच्या धडकेत महाविद्यालयीन तरुणीचा मृत्यू

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरूनगर -कनेरसर मार्गावर मांडवळा (ता. खेड) येथे भरधाव मोटारीची दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात १९ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीचा जागीच मृत्यू झाला. श्रेया संदीप खैरे (रा. चव्हाणमळा, पाबळ रोड, साई रेसिडेन्सी, राजगुरुनगर, मूळ गाव -खैरेनगर, पाबळ, ता. शिरूर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरूणीचे नाव आहे. याबाबत तिचे आजोबा काळूराम सीताराम खैरे यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात मोटार चालकावर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २५) रात्री सव्वानऊच्या सुमारास श्रेया खैरे या त्यांची दुचाकी स्कूटी ( क्र. एम.एच.१४, एफ.वाय. ३४२२) वरून घरी राजगुरुनगरला येत होत्या. होलेवाडी हद्दीतील मांडवळा येथे सी.एन.जी. पंपासमोर राजगुरुनगर बाजूकडून आलेल्या टोयटा ग्लेझा मोटारीने ( क्र. एम. एच. ४३, सी.एम. ५०८१) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात श्रेया यांचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर मोटारचालक पंपासमोर मोटार लावून पळून गेला.

## अल्पा मनोज शाह यांची मेंटर म्हणून नियुक्ती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

यूएसक्वायर मीडिया अँड पब्लिसिटी प्रस्तुत पुणे सुपरमॉडेल 2025 सिझन 3 साठी प्रसिद्ध आणि अनुभवी मॉडेल अल्पा मनोज शाह यांची मेंटर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अल्पा मनोज शाह या फॅशन क्षेत्रात एक अत्यंत अनुभवसंपन्न व्यक्तिमत्त्व मानल्या जातात. त्यांनी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय फॅशन शोमध्ये सहभाग घेतला असून, त्यांचा अनुभव या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी फारच उपयुक्त ठरणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या नवोदित मॉडेल्सना अल्पा शाह त्यांच्या वॉक, पोझिंग, स्टाईलिंग, संवादकौशल्य आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी मार्गदर्शन करतील. स्पर्धकांना फॅशन इंडस्ट्रीबद्दल सखोल



समज, व्यावसायिक दृष्टिकोन आणि करिअरसाठी आवश्यक असलेले विविध पैलू शिकवले जातील. अल्पा शाह यांच्या मार्गदर्शनामुळे स्पर्धकांना केवळ स्पर्धेत यश मिळवण्याची नव्हे, तर त्यांच्या पुढील मॉडेलिंग करिअरसाठीही भक्कम पाया मिळेल.

पुणे सुपरमॉडेल 2025 सिझन 3 ही स्पर्धा पुण्यात होणार असून, यात विविध वयोगटातील आणि श्रेणीतील मॉडेल्सना सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेद्वारे स्पर्धकांना विविध फॅशन शोमध्ये भाग घेण्याची, प्रसिद्ध ब्रँड्ससोबत काम करण्याची आणि आपले मॉडेलिंग करिअर घडवण्याची संधी मिळणार आहे.

शोचे दिग्दर्शक उद्धव खरड यांनी सांगितले की, “अल्पा मनोज शाह यांच्यासारख्या अनुभवी व्यक्तीची मेंटर म्हणून निवड ही आमच्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धकांना एक नवी दिशा आणि प्रेरणा मिळेल.”

स्पर्धेबाबत अधिक माहिती व नोंदणीसाठी लवकरच अधिकृत संकेतस्थळावर तपशील जाहीर करण्यात येणार आहेत.

# भूपेंद्र मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

## नऱ्हे करांसाठी सर्वांगीण विकासासाठी, गरज लागल्यास पाण्यासाठी पुन्हा उपोषण करणार : मोरे

- **रूपालीताई चाकणकर, खा. निलेश लंके, आ. शिरीष चौधरी, दोडके यांच्यासह मान्यवराकडून मोरेंना शुभेच्छा**
- **भूपेंद्र मोरे आगामी नगरसेवक होणार; नागरिकांना विश्वास**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

शिवराज्य समूहाचे संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला कार्याध्यक्ष,सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. नऱ्हे येथील महाराज पॅलेस येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी मोरे यांना शुभेच्छा देण्यासाठी नऱ्हे व परिसरातील कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी मोठी गर्दी केली.

आगामी महानगरपालिकेमध्ये भूपेंद्र मोरे हे नगरसेवक होणार असा विश्वास य नागरिकांनी व्यक्त केला.

भूपेंद्र मोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून यानिमित्त रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले होते. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला.

सकाळपासून नागरिकांनी सह मित्र मंडळींनी त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव केला.

एक संघर्षमय परिस्थितील तरुणाने मजल मारत केलेला हा प्रवास सर्वांना थक्क करतोय.

सामाजिक कार्य करता जनतेच्या मनामध्ये भूपेंद्र मोरे यांनी विशेष स्थान मिळवले आहे. याची प्रचितीवाढदिवसाच्या निमित्त दिसून आली.

कुटुंबातील सदस्य व इतर महिलांनी त्यांचे औक्षण केले व



त्यानंतर' "भावी नगरसेवक" नावाचा मोठा केक कार्यकर्त्यांच्या मित्र मंडळाच्या उपस्थित कापण्यात आला..

दिवसभर कार्यकर्त्यांची रेलचेल व आपले लाडके नेत्याला शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी होती.

कोणताही झगमगाठ नसतानाही अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. भूपेंद्र मोरे यांना वाढदिवसानिमित्त राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर, खासदार निलेश लंके, आमदार शिरीष चौधरी, सचिन दोडके, बाबा धुमाळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या..

नऱ्हेकरांच्या प्रश्नासाठी सातत्याने धावणारा हा नेता नगरसेवक व्हायलाच पाहिजे , त्यासाठी आम्ही प्रयत्नाची पराकाष्टा करू असा विश्वासही अनेक नागरिकांनी व्यक्त केला. यावेळी सौ. नेहा ताई मोरे,राजाभाऊ जाधव , विठ्ठल सूर्यवंशी, हरीश वैद्य, विशाल खरात, प्रशिक दारुंडे, सुरज दांगडे,लतीफ शेख, सुनील पढेर, सोनाली नायर,यांच्यासह नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वाढदिवसाच्या निमित्त बोलताना भूपेंद्र मोरे यांनी शुभेच्छा देणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार मानले. व आगामी काळामध्ये नऱ्हेगावच्या सर्वांनी विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

शिवाय शुद्ध व मुबलक पाणीपुरवठ्यासाठी आगामी काळामध्ये मोठे उपोषण करणार असल्याचे जाहीर केले.

कार्यकर्त्यांच्या व नागरिकांच्या शुभेच्छांचा वर्षाव पाहता जनतेला माझ्याकडून असलेल्या अपेक्षा दिसून येतात. त्या विश्वासास पात्र राहून आगामी काळामध्ये त्यांच्यासाठी निश्चित प्रयत्न करणार आहे असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.





## थोडक्यात



### पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा वडगाव बुद्रुक मध्ये निषेध

- पाकिस्तानला धडा शिकवण्याची नागरिकांची मागणी

वडगाव बु (आरंभ पर्व) : जम्मू कश्मीर येथे हिंदू पर्यटकांवर झालेल्या भ्याड आतंकी हल्ल्याच्या निषेधार्थ वडगाव बुद्रुक मधील नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक घुलेनगर ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक पर्यंत तीव्र निषेध मोर्चा काढून निषेध व्यक्त केला. भारत माता की जय च्या जयघोषात तीव्र आंदोलन केले. व दहशतवाद्यांना पाठीशी करणाऱ्या पाकिस्तानी सरकारला धडा शिकवावा अशीही मागणी यावेळी नागरिकांनी केली. यावेळी ह्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले पुण्यातील स्व. कौस्तुभ गणबोटे आणि स्व. संतोष जगदाळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मा.नगरसेवक हरिदास चरवड, हेमंतदादा दांगट पाटील, संजय पवळे, आनंददादा दांगट, चंदन कड, स्वप्निल वाघ, संदीप चरवड, सिद्धेश पाटील, जितेंद्र चम्पानेरकर, सुनील चरवड,सुदर्शन नाना दांगट, केदार जाधव, संग्राम पवार, अनंता भोईर, प्रसाद जांभोरकर,शर्वरी पाचलग, मनालीपुराणिक, नंदकिशोर गोसावी इत्यादी मान्यवरांसह वडगाव बुद्रुक मधील शेकडो नागरिक उपस्थित होते.



### साहित्य, संगीत व कला सेवा समिती नांदेड सिटीच्यावतीने श्रद्धांजली सभा

धायरी(आरंभ पर्व) : दिनांक २२.०४.२०२५ रोजी काश्मीर मधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या भारतीय भावंडाना, नांदेड सिटी येथील साहित्य संगीत व कला सेवा समितीच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष श्री रुपेश घुले, उपाध्यक्ष श्री हेमेंद्र जोशी व श्री गिरीश वसेकर, सचिव श्री वर्धमान भालेराव उपस्थित होते. तसेच नांदेड सिटीतील ज्येष्ठ नागरिक श्री राजेंद्र शहा, श्री राजेंद्र मते,श्री गायकवाड ,श्री विजयकुमार शिंदे,सौ रश्मी घुले वहिनी, सौ संगीता शिंदे,सौ. संध्या कुलकर्णी, सौ मीनाताई देशमुख, सौ वंदना सोमठाणकर सौ सुप्रिया करमरकर श्री महेश बजाज,श्री. राजेंद्र माने, श्री शेषराव गायकवाड, श्री वडुळकर, सौ शारदा फलफले आदी उपस्थित होते. सर्वांनी घडलेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्याचा निषेध केला,आणि पाकिस्तान मुर्दाबाद, भारत माता की जय या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

### पुण्यात खळबळ : खून करून बायकोचा मृतदेह फेकला दरीत

पुणे (आरंभ पर्व) : पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या पतीने पत्नीचा गळा आवळून खून केल्याची घटना इंदापूर तालुक्यातील काळाशी येथे घडली. नराधम पतीने पहिल्यांदा पत्नीचा गळा आवळून खून केला. याप्रकरणी प्रियांका करे यांच्या हत्येच्या आरोपामध्ये पती ज्योतीराम करे आणि त्याचा मित्र दत्तात्रय गोलांडे अशा दोघांना अटक करण्यात आले आहे. ज्योतीराम करे याने खुनानंतर पत्नीचा मृतदेह नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथील घाटात सुमारे दीडशे फूट खोल दरीमध्ये फेकल्याचे पुढे तपासात आढळून आले. पत्नीचा खून करून, ती हरवल्याची उलटी तक्रार ज्योतीराम करे याने इंदापूर पोलीस ठाण्यात दिली. या खून प्रकरणातील गूढ इंदापूर पोलिसांनी तीन महिन्यांनंतर उलगडले आहे. २०१३ मध्ये इंदापूर तालुक्यातील चितळकरवाडी येथील प्रियांका शिवाजी चितळकर हिचा विवाह इंदापूर तालुक्यातील कळाशी येथील ज्योतीराम करे याच्याशी झाला होता.

# यशवंत जमीन विक्री प्रकरणी सभासदांची उच्च न्यायालयात याचिका धाव

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**



यशवंत सहकारी साखर कारखाना थेऊर यांच्या पुणे कृषि उत्पन्न बाजार समिती यांना प्रस्तावित जवळपास शंभर एकर जमीन विक्रीच्या संचालक मंडळाच्या निर्णयाच्या विरोधात कारखान्याच्या विकास लवांडे, लोकेश कानकाटे , सागर गोटे, राजेंद्र चौधरी या सभासद शेतकऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालय येथे याचिका दाखल केली असून सदर याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती ए.एस.चांदुरकर व न्यायमूर्ती मिलिंद साठे या खंडपीठापुढे झाली .सदर सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने खंडपीठास यशवंत प्रकरणी सभासद शेतकऱ्यांनी या पूर्वी दाखल व निकाली झालेल्या याचिकेतील अंतरिम आदेश व निकाल निर्दर्शनास आणून देण्यात आले. याबाबत याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते की यशवंत सहकारी साखर कारखाना संस्था ही वर्ष २०१२/१३ पासून आज तागायत बंद आहे वर्ष २०१७ मध्ये संस्था अवसानात काढण्यात आली व पुढे वर्ष २०२२ मधे अवसायन रद्द होत वर्ष २०२४ मध्ये संचालक मंडळाची निवडणूक झाली. या सर्व कालावधी दरम्यान संस्थेचे नेमकी देणेदारी किती आहे व संस्थेची येणे किती आहे याबद्दल कोणताही ठोस स्वरूपाचा अहवाल व लेखाजोखा उपलब्ध नसल्याने मुळात संस्थेचे राज्य सहकारी बँकेला किती रक्कम देणे बाकी आहे यात तफावत असल्याने याचा निर्णय होणे जरुरी आहे तसेच संस्थेची संपूर्ण मालमत्ता राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात असताना सदर कारखाना ताब्यात घेताना कारखान्याची मशनरी व इतर सामग्री यात आता मोठी तफावत असून मोठ्या प्रमाणात मशिनरी गायब झाल्याने सभासदांचे तब्बल ५० कोटी रुपयांचे सभासद शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे याचिकाकरत्यांचे वकील ॲड योगेश पांडे यांनी न्यायालयाच्या निर्दर्शनास आणले. तसेच संस्थेच्या पूर्वीच्या संचालक मंडळांनी केलेल्या आर्थिक अपहार प्रकरणी वर्ष २०१३/१४ पासून यांच्याकडून तब्बल १४ कोटी रुपये व त्यावरील व्याज त्यांच्याकडून वसुलीसाठी प्रादेशिक साखर संचालकांचे आदेश झाले होते मात्र रक्कम वसुलीसाठी आज पर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही. मागील रक्कम येणे बाकी तसेच साखर विक्रीतून वर्ष २०११/१२ मधे प्राप्त रक्कम वीस कोटी रुपये राज्य सहकारी बँकेत जमा करण्यात आली असताना याचाही हिशोब जुळत नसल्याने सकृतदर्शनी यशवंत सहकारी ला देणेच लागत नाही असेही मे. कोर्टाच्या निदर्शनास आणून दिल्याने सर्व बाबींचा विचार करता कोर्टाने याबाबत संबंधित सर्व प्रतिवादी यांना कोर्ट नोटीस जारी करत या प्रकरणाची पुढील सुनावणी २० जून रोजी नियोजित निर्धारित केली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड योगेश पांडे तसेच राज्य शासन तर्फे ॲड वाळिंबे व इतर प्रतिवादी यांच्या वतीने ॲड अभिजित कदम , ॲड प्रसाद आव्हाड यांनी बाजू मांडली.

## पुणे सुपरमॉडेल २०२५ : डॉ. स्नेहल

### कॉर्पोरेट नेतृत्व आणि फॅशनमधील तेजस्वी प्रवास



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कॉर्पोरेट क्षेत्रातील एक आघाडीची एचआर डायरेक्टर असूनही, डॉ. स्नेहल यांनी फॅशन क्षेत्रातही आपला ठसा उमठवला आहे. विविध रनवे शो, कॅटलॉग आणि ज्वेलरी शूट्समध्ये त्यांनी सहभाग घेतल्याने त्यांची सर्जनशीलता आणि आत्मविश्वास अधोरेखित होतो. २०२४ मध्ये USsquare सोबत त्यांनी आपल्या फॅशन प्रवासाची नवी दिशा ठरवत सेकंड रनर-अपचा किताब मिळवला. त्यांचा हा यशस्वी प्रवास यंदा पुणे सुपरमॉडेल २०२५ मध्ये अधिक झळाळून उठला आहे, जिथे त्या केवळ स्पर्धक म्हणूनच नव्हे तर आयोजक मंडळातही सक्रिय आहेत. कॉर्पोरेट नेतृत्वातील अनुभव आणि फॅशन क्षेत्रातील स्टाईल यांचा सुरेख संगम साधत, डॉ. स्नेहल नव्या पिढीतील तरुणींना आपल्या विविध पैलूंना वाव देण्याची प्रेरणा देत आहेत.



## दहशतवादी हल्ल्याचा खेड तालुका पत्रकार संघाच्यावतीने निषेध

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

**किरण खुडे**

जम्मू- काश्मिर येथील पहलगाम मधील पर्यटकांवरील झालेल्या पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ल्याचा येथील खेड तालुका पत्रकार संघाच्या वतीने निषेध करण्यात आला. तसेच दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करावी. अशी मागणी सरकारकडे करण्यात आली. याबाबतचे निवेदन येथील तहसिलदार व प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आले.

निरपराध भारतीय पर्यटकांवरील हा भ्याड स्वरूपाचा हल्ला करून मानवतेला काळीमा फासणारा प्रकार शेजारी राष्ट्रातील काही प्रवृत्ती करत आहेत. अशा प्रवृत्ती व त्यांचे पोशिंदे यांचा नायनाट करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

याप्रसंगी प्रांताधिकारी प्रांताधिकारी अनिल दौंडे व तहसीलदार प्रशांत बेडसे यांना याविषयीचे निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी खेड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय शेटे, सचिव किरण खुडे, कार्याध्यक्ष रोहीदास गाडगे, माजी अध्यक्ष सुनिल थिगळे, बाळासाहेब सांडभोर, महेंद्र शिंदे, उपाध्यक्ष ॲड निलेश आंधळे तसेच नाजिम इनामदार, अशोक कडलक, अशोक कोरडे, रविंद्र साकोरे आदी पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## नूतन राकेश राणे ‘पुणे सुपरमॉडेल २०२५’ मध्ये फायनलिस्ट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



नूतन राकेश राणे या पुण्याच्या अत्यंत यशस्वी बिझनेस वूमन, ब्युटीशियन आणि इंटरनॅशनल सर्टिफायड मेकअप आर्टिस्ट, ‘पुणे सुपरमॉडेल २०२५’ या स्पर्धेत फायनलिस्ट ठरल्या आहेत. मागील १७ वर्षांपासून या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नूतन राणे या एक प्रोफेशनल मॉडेल सुद्धा आहेत.

नूतन यांनी सुप्रसिद्ध मराठी अभिनेते अभिजीत खांडकेकर सरांसोबत २०२५ च्या नवीन वर्षाच्या कॅलेंडरसाठी फोटोज शूट केले असून, डिझायनर साडी ब्रँड आणि मलबार गोल्ड ब्रँडसाठी वाशी, ठाणे येथे ज्वेलरी शूट देखील केले आहे.

“प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या पायावर उभं राहून जीवनात यशस्वी व्हावं, हा माझा विश्वास आहे,” असं त्या अभिमानाने सांगतात.

त्यांना वेगवेगळ्या पेहरावांबरोबरच दागिन्यांचीही विशेष आवड असून, यामुळेच त्यांनी मॉडलिंग क्षेत्रात पाऊल ठेवलं. त्यांना इंस्टाग्रामवरील उद्धव खराड सर यांचे ‘यू एस स्क्वेअर मीडिया’ हे अकाउंट आणि यूट्यूबवरील त्यांच्या कार्यक्रमांचे आकर्षण वाटले. या क्षेत्रात रस असलेल्या व्यक्तींना त्यांनी दिलेल्या संधी अत्यंत प्रेरणादायक आहेत, असं नूतन म्हणाल्या.

याच प्रेरणेने त्या ‘सुपरमॉडेल’ स्पर्धेत सहभागी झाल्या आणि आता फायनलिस्ट म्हणून पुढील प्रवासासाठी सज्ज आहेत. त्यांना चित्रपटसृष्टीतही काम करण्याची मोठी इच्छा असून, त्या दृष्टीने त्या पुढे पावले टाकत आहेत.

हा शो पुण्यात होणार असून, नूतन राणे यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## बिडकर, भिमाले, शिळमकर यांची नावे आघाडीवर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भाजपमध्ये सध्याच्या संघटनात्मक बदलाचे वारे वाहताना पाहायला मिळत आहेत. केंद्रीय नेतृत्वाच्या निर्देशानुसार प्रदेश व शहर पातळीवर मोठे बदल घडवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे शहर भाजपच्या अध्यक्षपदासाठी निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे.

सध्या या पदासाठी श्रीकांत भिमाले, गणेश बिडकर आणि राहुल शिळमकर यांची नावे प्रामुख्याने चर्चेत आहेत. पुण्यात नव्या शहराध्यक्ष निवडीसाठी अनेक संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत होती. मात्र वरिष्ठ स्तरावर झालेल्या बैठकीनंतर भिमाले, बिडकर आणि शिळमकर यांच्या नावांचा विचार अंतिम यादीत करण्यात आला आहे.

भाजपच्या नियमानुसार, शहराध्यक्षपदासाठी वयाची ५० वर्षांची अट असते. या निकषावर आधारित अंतिम यादी तयार करण्यात आली. यातून कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचा व्यापक अनुभव, शहरातील जनसंपर्क, संघटन कौशल्य आणि पक्षनिष्ठा या बाबी लक्षात घेण्यात आल्या. सध्या भिमाले, बिडकर व शिळमकर या तिघांचेही कार्यकर्त्यांमध्ये चांगले बळ असून त्यांचा स्थानिक तसेच पक्ष पातळीवर चांगला प्रभाव आहे.

# एअरटेलने आंतरराष्ट्रीय रोमिंग (आयआर) अनुभवात क्रांती घडवून आणण्यासाठी नवीन प्लॅन्सची घोषणा केली आहे

### १८९ देशांमधील निवडक प्लॅन्सवर अमर्याद डेटाचा उपहार देऊन भारताच्या पहिल्यावहिल्या आयआर प्लॅन्सचे अनावरण केले

**नवी दिल्ली, (दै. आरंभ पर्व)**

- १ वर्षाची वैधता उपाहारात देऊन क्रांतिकारी रिचार्ज प्लॅन लॉंच केला आहे ज्यात एकाच प्लॅनअंतर्गत भारतातील आणि परदेशातील, असे दोन्ही फायदे मिळतात

भारती एअरटेलने आपल्या आयआर पोर्टफोलिओमध्ये नवीन प्लॅन्सची घोषणा केली आहे. या प्लॅन्समुळे ग्राहकांना सोपे जाणार असून त्यांच्यासाठी ते अधिक परवडणारे आणि पूर्णपणे त्रासमुक्त असतील. कंपनीने 189 देशांमध्ये अमर्यादित डेटा ऑफर करणारे भारताचे पहिले अमर्यादित* आयआर प्लॅन्स सादर केले आहेत.

याव्यतिरिक्त, दीर्घकाळ राहणाऱ्या एनआरआय समुदायासाठी एअरटेलने एक वर्षाची वैधता असलेला रु. 4000 चा एक अनोखा रिचार्ज प्लॅन सुद्धा लॉंच केला आहे. या प्लॅनमध्ये परदेशात असल्यावर वापरण्यासाठी 5जीबी डेटा आणि 100 व्हॉईस मिनिटे मिळतात, तर भारतात असलेल्या ग्राहकांना हाच प्लॅन वापरुन दररोज 1.5जीबी डेटा आणि अमर्यादित कॉल्सचे लाभ मिळविता येतात. हा प्लॅन ग्राहकांना 189 देशांमध्ये कुठेही विनाअडथळा कनेक्टिव्हिटीचा अनुभव देत आहे आणि भारतात असताना तोच नंबर वापरता येणार असून त्यासाठी वेगळा रिचार्ज करावा लागणार नाही.

सिद्धार्थ शर्मा, डायरेक्टर मार्केटिंग आणि सी.ई.ओ - कनेक्टेड होम्स, भारती एअरटेल म्हणाले, "एअरटेल येथे आमच्या ग्राहकांचे जीवन सोपे करण्याचे आणि त्यांना अधिक मूल्य आणि सुविधा देण्याचे समर्पण आम्ही हाती घेतलेले आहे. आम्ही खरोखरच ग्राहकांसाठी आमच्या मूल्य प्रस्तावाची पुनर्व्याख्या करणारे आणि त्यांना जगभरात फिरताना डेटा आणि व्हॉईस उदारपणे वापरण्याचे स्वातंत्र्य देणारे आयआर प्लॅन्स नाट्यमय पद्धतीने सुलभ केलेले आहेत. आम्ही आमच्या ग्राहकांच्या सतत विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करणारे समाधान सतत देण्याची बांधिलकी स्वीकारलेली आहे."

**वारंवार प्रवास करणाऱ्यांसाठी ऑटो रिन्युअल सुविधा. यामुळे पॅक अनेकवेळा खरेदी करण्याची गरज उरणार नसल्याने प्रवास करताना त्रास होणार नाही पॅक्स परवडणारे आहेत. हे बहुतेक देशातील/ स्थानिक सिमच्या तुलनेत जास्त परवडणारे असतील आणि स्थानिक सिमकार्ड मिळविण्याचा त्रास आणि खर्च दूर करतील व त्यायोगे जगभर फिरणाऱ्यांना संपर्कात राहण्यासाठी एक सोपा उपाय प्रदान करतील.ग्राहकाला सगळ्या गोष्टींवर नियंत्रण करता येईल. एअरटेल थँक्स ॲपवर त्यांना त्यांच्या संपूर्ण आंतरराष्ट्रीय रोमिंग गरजा सांभाळता येणार असून त्यात वापर, बिलिंगची रक्कम आणि गरजे पडेल तशी डेटा किंवा मिनिटे जोडणे याबद्दल अद्यतने मिळतील.**

ग्राहक हे प्लॅन्स घेऊन इतर आयआर फायद्यांचा आनंद उचलत राहू शकतील ज्यात सामील आहे:

विमानाच्या आत कनेक्टिव्हिटी, परदेशात उतरल्यावर सेवा आपोआप सक्रिय होणे, 24x7 ग्राहक सेवा समर्थन.

189 देशांमध्ये प्रवास करण्यासाठी एकच प्लॅन. कोणता झोन किंवा पॅक निवडायचा, याबाबत अस्पष्टता उरत नाही. अनेक देशांमध्ये किंवा ट्रान्झिट एअरपोर्टवर एकापेक्षा जास्त पॅक्सची गरज भासत नाही.



## थोडक्यात



### महिलांना सक्षमता, सुरक्षितता आणि हक्कांची जाणीव हवी : सरुताई वाघमारे

**• अरुणा एज्युकेशन फाउंडेशनतर्फे महिला कामगारांसाठी कार्यशाळा**

**पुणे (आरंभ पर्व) :** महिला कामगारांना सक्षम, सुरक्षित जीवन जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे. त्यासाठी त्यांच्यामध्ये जाणीव निर्माण व्हायला हवी. कामगार महिलांच्या जीवनकौशल्य आणि कायदेशीर हक्कांसाठी, त्यांच्या सशक्तीकरणासाठी काम करणारी 'अरुणा संस्था' म्हणजे उपेक्षित समुदायातील महिलांसाठी नव्या आशेचा किरण आहे," असे मत कवयित्री सरुताई वाघमारे यांनी व्यक्त केले. अरुणा एज्युकेशन फाऊंडेशनच्या वतीने 'सक्षमता, सुरक्षितता आणि हक्कांची जाणीव' या विषयावर एकदिवसीय क्षमतावृद्धी कार्यशाळा झाली. कार्यशाळेत अनेक कष्टकरी महिला कामगार, विविध स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणाऱ्या युवकांनी सहभाग घेतला. अरुणा एज्युकेशन फाऊंडेशनच्या अभिधा निफाडे उपस्थित होत्या. यावेळी शासकीय योजना, सामाजिक संरक्षण, आयुष्मान भारत, श्रमिक कार्ड, वृद्धापकाळ पेन्शन, शिष्यवृत्ती यांसारख्या योजनांची माहिती व अर्ज प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. सरूबाई वाघमारे म्हणाल्या, "या कष्टकरी, कचरावेचक महिला, स्थलांतरित कामगार यांचे अनेक महत्वाचे प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. त्यांच्या सामाजिक, कायदेशीर संरक्षणाचा, जीवनकौशल्याचा मुद्दा महत्वाचा आहे. कचरावेचक महिला आणि त्यांच्या पुढील पिढीला शिक्षणाच्या प्रवाहात यायचे असेल, योजनांचा लाभ घ्यायचा असेल, तर त्यासाठी काही मूलभूत कागदपत्रांची आवश्यकता असते. अशावेळी स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटूंबियांसमोर उद्भवणाऱ्या प्रश्नांवर मार्ग काढायला हवेत."




### 'महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' शोमधून जिंकतायत प्रेक्षकांची मन

**पुणे (आरंभ पर्व) :** 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' हा महाराष्ट्रातील कीर्तनकारांवर आधारित असलेला पहिला वहिला रिॲलिटी शो असून याने कीर्तनकारांना खूप मोठी संधी देणारा प्लॅटफॉर्म 'सोनी मराठी' वाहिनीनं उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्राच्या कीर्तन परंपरेला या शोच्या माध्यमातून अनोखी मानवंदना दिली जातेय. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधून १०८ कीर्तनकारांसह हा शो सुरू झाला आणि महाराष्ट्राचा सांस्कृतिक असा अनमोल ठेवा अभिमानानं रसिकांसमोर आणला. 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' या सोनी मराठी वाहिनीच्या रिॲलिटी शो अंतर्गत महाराष्ट्रातील कीर्तनकारांना खूप मोठा रंगमंच मिळाला आहे. छोट्या पडद्यावर कीर्तन करण्याची मिळालेली संधी हा त्यांच्यासाठी दुग्धशर्करा योग आहे. सध्या या शोला महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून प्रेक्षकांची पसंती मिळतेय. प्रेक्षक वर्ग, रसिक चाहते मंडळी या शोला भरभरून प्रेम देताना दिसत आहेत. विशेष करून सबंध महाराष्ट्रातून या शोला उदंड प्रतिसाद मिळतोय कारण महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून आलेले कीर्तनकार त्यांच्या कीर्तनसेवेने सगळ्यांची मने जिंकत आहेत. सोनी मराठी वाहिनीच्या 'कोण होणार महाराष्ट्राचा कीर्तनकार' या मंचावर अधिकतर पश्चिम महाराष्ट्रातील कीर्तनकार सबंध महाराष्ट्राच लक्ष वेधून घेत आहेत. पश्चिम महाराष्ट्रात कीर्तन या विषयाची अधिक गोडी आहे. कीर्तन हा प्रकार मुख्यत्वे पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो.

# मणिभाई देसाई यांची १०५वी जयंती उत्साहात साजरी



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

महात्मा गांधीजींचे सहकारी, धवल क्रांतीचे आद्य जनक, ग्रामीण विकासाचे प्रणेते, स्वतंत्रता सेनानी व महात्मा गांधी सर्वोदय संघाचे संस्थापक पद्मश्री मणिभाई देसाई यांचे सामाजिक व ग्रामीण विकासातील योगदान हाच आपल्यासाठी वसा आणि वारसा असून तो जतन करण्याची व पुढे नेण्याची परंपरा आपल्याला कायम राखावी लागेल आणि हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे प्रतिपादन पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी केले. येथील पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई यांच्या १०५ व्या जयंती निमित्त अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रारंभी मणिभाईंच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. बोऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. बोऱ्हाडे म्हणाले की, टाटा-बिर्ला यांची जयंती साजरी केल्याचे कधी ऐकिवात नाही मात्र समाजासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या व गरिबांसाठी चंदनाप्रमाणे आपला देह झिजवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या जयंती-पुण्यतिथीचा समाजाला कधीही विसर पडत नाही. गुजरातच्या खेड्यातून येऊन उरुळीकरांसाठी महात्मा गांधीजींच्या शब्दाखातर तहहयात आपले जीवन समर्पित करणाऱ्या मणिभाईंचे जीवनकार्य हे असेच अलौकिक स्वरूपाचे आहे असेही ते म्हणाले.

यावेळी मणिभाईंच्या जीवनकार्यावर पीएच. डी. पदवी संपादन केलेले इतिहास विभाग प्रमुख डॉ. अमोल बोत्रे यांनी त्यांच्या संपूर्ण कार्याचा संक्षिप्त आढावा घेतला. महात्मा गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन मणिभाई देसाई यांनी आपल्या जीवनाची वाटचाल सुरू करून ग्रामीण विकासाच्या सर्वच क्षेत्रात भरीव योगदान दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उरुळी कांचन ही कर्मभूमी मानून निसर्गोपचार आश्रम व भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाउंडेशन (बाएफ) यांसारख्या अनेक संस्थांची त्यांनी स्थापना केली. यावेळी कला विभाग प्रमुख डॉ. समीर आबनावे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुजाता गायकवाड, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. नंदिनी सोनवणे, संगणक विभाग प्रमुख प्रा. वैशाली चौधरी, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शुभांगी रानवडे तसेच सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन अधीक्षक प्रदीप राजपूत, सांस्कृतिक विभाग प्रमुख, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले.

## क्रीडा भविष्यावर विचार विनिमय करण्यासाठी स्पोर्ट्स कॉन पुणे २०२५चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी (ISST) तर्फे आयोजित स्पोर्ट्स कॉन पुणे २०२५ या महत्त्वपूर्ण परिषदेमुळे पुणे शहर भारताच्या क्रीडा नवोन्मेषाचे केंद्र बनले. देशभरातील खेळाडू, प्रशिक्षक, उद्योजक, क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी, आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्र येऊन भारताच्या २०३६ ऑलिंपिक स्वप्नांना आकार देण्यासाठी विचारमंथन केले. कार्यक्रमाची सुरुवात भारताच्या ऑलिंपिक संकल्पनेवर आधारित प्रेरणादायी व्हिडिओने झाली आणि त्यानंतर राष्ट्रगीत सादर करण्यात आले. ISST च्या ऑपरेशन्स डायरेक्टर तन्वी लुनावत यांनी उपस्थितांचे स्वागत करत, "या कार्यक्रमात आपण केवळ चर्चा करत नाही, तर क्रीडाक्षेत्राचे भविष्य घडवत आहोत," असा आशावादी संदेश दिला. कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन मधुकर तळवलकर (संस्थापक, तळवलकर फिटनेस), डॉ. प्रणती टिळक (टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विश्वस्त) आणि श्रीमती उज्ज्वला लुनावत (अध्यक्ष, ISST) यांच्या हस्ते 'सपलिंग वॉटरिंग सेरेमनी'ने झाले. यामध्ये नवोदित क्रीडापटूंच्या घडणुकीसाठी पायाभूत स्तरावर काम करण्याचा संदेश देण्यात आला. पहिले चर्चासत्र "लीग संस्कृतीचे विश्लेषण: भारतीय क्रीडेचे नवे रूप" या विषयावर आधारित होते. डॉ. विपुल लुनावत यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या चर्चासत्रात कैलाश कांडपाळ (CEO, पुणेरी पलटन), पर्विन दबास (सहसंस्थापक, प्रो पंजा लीग), मंदार तम्हाणे (CEO, नॉर्थ ईस्ट युनायटेड FC) आणि ऋषी भानसाळी (COO, पुणे युनायटेड – वर्ल्ड पिकलबॉल लीग) यांचा सहभाग होता. या चर्चेत लीग संस्कृतीमुळे निर्माण होणाऱ्या नव्या संधी, शालेय व ग्रामीण स्तरावरून प्रतिभा शोधणे, आणि धोरणात्मक पाठबळाची गरज या मुद्द्यांवर भर देण्यात आला.

## पहलगाम येथील हल्ल्याच्या निषेधार्थ लोणी काळभोर कदमवाकवस्ती येथे मोर्चा

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

जम्मू-काश्मीरमधील पहगामच्याबैसरण घाटीत दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामस्थांनी निषेध मोर्चा काढून मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहिली .

जम्मू काश्मीर येथील पहलगाम या ठिकाणी धर्मांध अतिरेक्यांकडून निष्पाप हिंदूंची हत्या करण्यात आली. यामध्ये सुमारे २८ हिंदूबांधव मृत्युमुखी पडले असून इतर अनेक लोक गंभीर जखमी झालेले आहेत. सदर घटना ही अमानवीय व धर्म द्वेशातून झालेली असून याची करावी तितकी निंदा कमीच आहे.

तरी संविधानीक मार्गाने या घटनेचा निषेध करण्यासाठी व मृत्युमुखी पडलेल्या हिंदू बांधवांना



श्रद्धांजली वाहण्यासाठी शुक्रवार दिनांक २५ एप्रिल रोजी सायंकाळी सायंकाळी ६ वा. लोणी स्टेशन चौकातून या मोर्चास सुरुवात झाली श्री दत्त मंदिर- खोकलाई देवी चौक- नेहरू चौक -गणपती मंदिर चौक- श्री राम मंदिर- श्री हनुमान मंदिर चौक - येथून पुन्हा श्री खोकलाई देवी चौक या ठिकाणी श्रद्धांजली सभा झाली यावेळी सकल हिंदू समाज बांधवांनी बहुसंख्येने आपली उपस्थिती दाखवली.

यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रविण काळभोर, नवपरिवर्तन फाउंडेशनचे अध्यक्ष चित्तरंजन गायकवाड , भाजप नेते कमलेश काळभोर, शिवसेना (शिंदे गट) पुणे जिल्हा संघटक निलेश काळभोर, विशाल वेदपाठक, पै .मनोज काळभोर, संतोष भोसले, राष्ट्रीय खेळाडू सतिश काळभोर, ग्रामपंचायत सदस्य अविनाश बडदे, सविता वर्मा, शिवसेना कार्यकर्ते अतुल शिंदे, सामाजिक कार्यकर्ते पंढरीनाथ नामुगुडे, दिगंबर जोगदंड राहुल धेळे उपस्थित होते . यावेळी भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी लोणी काळभोर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.

# कृत्रिम बुद्धिमतेमुळे वैद्यकीय क्षेत्रात आमूलाग्र बदल होतील

### अच्युत गोडबोले यांचे मत; 'समवेदना'च्या २२ व्या वर्धापनदिनानिमित्त 'एआयची जादू आणि उद्याचे जग'वर व्याख्यान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट जीपीटी, नॅनो टेक्नॉलॉजी, स्पेस मायनिंग अशा अनेकानेक तंत्रज्ञानांमुळे सध्याची जगण्याची पद्धत आणि व्यवस्था झपाट्याने बदलत आहे. वैद्यकीय क्षेत्रातही 'एआय'मुळे अत्याधुनिक उपकरणे, उपचारपद्धती यामध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. येणारा काळ हा कल्पने पलीकडील तंत्रज्ञानाचा आणि वेगवान असणार आहे," असे मत प्रसिद्ध लेखक व तंत्रज्ञानाचे अभ्यासक अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले. 'एआय'मुळे सर्वच व्यवसाय आणि रोजगाराचे स्वरूप बदलणार असून, नवीन बदल, तंत्रज्ञान आत्मसात करणे सर्वच वयोगटांना अनिवार्य आहे असेही त्यांनी नमूद केले.




समवेदना संस्थेच्या २२ व्या वर्धापनदिनानिमित्त देणगीदारांसाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी अच्युत गोडबोले यांचे 'एआयची जादू आणि उद्याचे जग' या विषयावर व्याख्यान झाले. गोडबोले यांनी खास त्यांच्या शैलीत गप्पा, गोष्टी आणि 'एआय'चा इतिहास, वर्तमान, आरोग्य क्षेत्रातला उपयोग आणि भविष्यातील परिणाम यांची सुरेख सफर घडवली. एमईएस बालशिक्षण सभागृहात झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी 'समवेदना'चे विश्वस्त प्रकाश तुळपुळे, सल्लागार राजीव साबडे, मुख्य व्यवस्थापक अमर पवार आदी उपस्थित होते.

अच्युत गोडबोले म्हणाले, "माणसाला पडणारे प्रश्न आणि त्यावर शोधलेली उत्तरे माणसाच्या उत्क्रांतीमधील महत्त्वाचा घटक आहेत. माणसाने कल्पनाशक्तीच्या बळावर स्वतःच्या सुखासाठी अनेक सोयीसुविधा निर्माण केल्या. प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपण स्वत:च्याच मेंदूवर ताबा मिळवण्याच्या प्रयत्नात आहोत.

कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट जीपीटी, नॅनो टेक्नॉलॉजी, जेनेटिक इंजिनीअरिंग, स्पेस मायनिंग अशा अनेकानेक तंत्रज्ञानांमुळे सध्याची जगण्याची पद्धत आणि व्यवस्था या नव्या जगात कालबाह्य ठरतील. आगामी काळात युद्धसुद्धा रोबोटच्या साहाय्याने होतील."

"अनेक क्षेत्रात आपल्या रोजच्या कामाची जागा 'एआय' घेईल. 'एआय' सद्यस्थितीत मध्यस्थ म्हणून काम करत आहे. मात्र, येत्या काळात स्वतःहून विचार करायला लागले, निर्णय घ्यायला लागले, त्यामध्ये भावनिक स्पर्श निर्माण झाला, तर नव्या स्वरूपाची आव्हाने उभी राहतील.

विविध क्षेत्रातील नोकऱ्या नष्ट होतील, असे बोलले जात आहे. मात्र, नव्या संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण होतील. परदेशांत 'एआय'चा वापर करून शेती होत आहे. कलाविष्कार, लेखन 'एआय'मुळे सहज शक्य होऊ लागले आहे. त्यामुळे आपली कल्पनाशक्ती विकसित करण्यासह नवे बदल आत्मसात करणे गरजेचे आहे," असेही गोडबोले यांनी नमूद केले.

अमर पवार यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आरोग्य क्षेत्रात कार्यरत समवेदना संस्था उपचार, प्रतिबंध आणि प्रसार या त्रिसूत्रीवर आधारित उपक्रम राबविते. गरीब रुग्णांना आर्थिक मदत, शालेय आरोग्य व महिलांसाठी कॅन्सर उपक्रमासोबत मानसिक स्वास्थ्याचा विषयही हाती घेतला आहे.

यंदा समवेदना उपक्रमांचा २०,००० हून अधिक शहरी व ग्रामीण व्यक्तींनी लाभ घेतला. त्यांच्या सामाजिक आणि मानसिक समस्या समोर येत आहेत. त्यावर संस्थेने काम सुरु केल्याचे पवार यांनी नमुद केले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. मनोहर कलुंजे यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय दर्जाचे व ऐतिहासिक स्मारकासाठी प्रयत्नशील

**कर्णेश्वर हे प्राचीन मंदिर आहे. या मंदिराचे काम अजही उत्तम दर्जाचे आहे. मंदिरांचे पावित्र टिकविले पाहिजे. महाराजांच्या स्मारकाच्या पाच एकर क्षेत्रामधील नदीच्या काठावरील मंदिरांचेही जतन केले जाणार आहे. छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या माध्यमातून भरघोस निधी देऊ. राष्ट्रीय पातळीचे स्मारक करताना हेरिटेज टच देऊन येथील हवामानाला प्रुफ असेल असे टिकाऊ बनवूया. स्थानिक पातळीवरील नकाशे, अन्य बाबी लवकरात लवकर पूर्ण करून मला माहिती द्या. ३० जूनला पावसाळी अधिवेशन होत आहे. यात स्मारकासाठीच्या निधीला मंजुरी द्यायची आहे, असेही स्पष्ट केले. छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक हे राष्ट्रीय दर्जाचे व ऐतिहासिक स्मारक होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. येत्या अधिवेशनात स्मारक व परिसर विकास प्रकल्पाच्या निधीला मंजुरी घेऊ. यावेळी पालकमंत्री डॉ. उदय सामंत, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, आमदार भास्कर जाधव आणि आमदार शेखर निकम यांनी आपले मनोगत व्यक्त केले.**

**संगमेश्वर (दै. आरंभ पर्व)**

छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक राष्ट्रीय दर्जाचे व ऐतिहासिक स्मारक होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. भव्य दिव्य होईल याकरिता पुरातत्व व बांधकाम विभागाने अजून अन्य मोठ-मोठ्या ठिकाणी असलेल्या प्रकल्पाचा अभ्यास करा आणि अजून भव्यता कशी आणता येईल हे पहा, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

कर्णेश्वर मंदिर, कसबा, संगमेश्वर येथे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी छत्रपती संभाजी स्मारक जतन, सर्वधन आणि परिसर विकास अनुषंगाने बैठकीत आढावा घेतला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी यावेळी पालकमंत्री डॉ. उदय सांमत,



महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, आमदार भास्कर जाधव, आमदार शेखर निकम, माजी आमदार सुभाष बने, माजी आमदार प्रमोद जठार, माजी जि. प. अध्यक्ष विक्रांत जाधव, माजी जि. प. अध्यक्ष रोहन बने, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे स्थापत्य अभियंता इंद्रजीत नागेश्वर अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

प्रथम उपमुख्यमंत्री श्री पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. यानंतर छत्रपती संभाजी महाराज स्मारक परिसराची आणि येथील सरदेसाई वाड्याची पहाणी करण्यात आली. यावेळी म्युझियम, ब्रिज कम बंधारा, व्हीगॅलरी, येथील नदीला येणारे पाणी, जुन्या मंदिरांचे जतन आदी विषयांवर अर्कीटेक्चर बरोबर चर्चा केली.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी पाहणी झाल्यानंतर कर्णेश्वर मंदिरात दर्शन घेतले आणि छत्रपती संभाजी स्मारक जतन, संवर्धन आणि परिसर विकास बैठकीत आढावा घेतला. बैठकीच्या सुरुवातीला पहलगाम, काश्मीर येथे दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या पर्यटकांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज स्मारक जतन, संर्वधन आणि परिसर विकासच्या अनुषंगाने पुरातत्व विभागाचे स्थापत्य अभियंता इंद्रजीत नागेश्वर यांनी सादरीकरण केले.

सादरीकरण पाहिल्यानंतर बैठकीमध्ये उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आवश्यक त्या सूचना केल्या. ते पुढे म्हणाले आपल्याला सर्वांना सोबत घेऊन हा प्रकल्प पुढे न्यायचा आहे. स्थानिकांच्या भावना जराही दुखावणार नाहीत याची काळजी घेऊन त्यांच्या सहमतीने आपल्याला स्मारक उभे करायचे आहे. ज्याची जागा जाईल, त्यांना योग्य तो मोबदला देऊ. स्मारक भव्य दिव्य होईल याकरिता पुरातत्त्व व बांधकाम विभागाने अजून अन्य मोठमोठ्या ठिकाणी असलेल्या प्रकल्पाचा अभ्यास करा आणि अजून भव्यता कशी आणता येईल हे पहा. हे सांगताना त्यांनी पिंपरी चिंचवड येथील शेखर सिंग या अभियंत्यांशी फोनद्वारे संभाषण साधले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.